कष्ट आणि प्रयत्नाशिवाय यश कधीच मिळत नाही.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | शनिवार ५ एप्रिल २०२५ | अंक ११४ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु







# दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या मनमानीमुळे महिलेचा मृत्यू

## देवेंद्र फडणवीसांनी घेतला मोठा निर्णय



### रुग्णालयाच्या चौकशीचा अहवाल

कमी वजनाची ७ महिन्याची जुळी मुलं, जुन्या आजाराची गुंतागुंत आणि कमीत कमी दोन ते अडीच महिने NICU चे उपचार लागतील हे समजावून सांगण्यात आले होते. १० ते २० लाख खर्च येऊ शकतो याची कल्पना देण्यात आली होती. त्यावर रुग्णाच्या नातेवाईकांनी तुम्ही भरती करुन घ्या, मी प्रयत्न करतो असे सांगितले. रुग्णाच्या नातेवाईकांनी वैद्यकीय संचालक डॉक्टर केळकर यांना फोन केला आणि आपली अडचण सांगितली. त्यावर डॉक्टर केळकरांनी जमतील तेवढे पैसे भरा म्हणजे (नातेवाईकांप्रमाणे दोन ते अडीच लाख) ते डॉक्टर घैसास यांना सांगतो असे सांगितले.

### नेमकं काय म्हणाले फडणवीस?

ही घटना अतिशय दुर्दैवी आहे, असंवेदनशिलतेचा परिचय या घटनेतून आपल्याला पाहायला मिळतो. खरं म्हणजे दीनानाथ मंगेशकर हे अतिशय रेप्युटेड अशा पद्धतीचं हॉस्पिटल आहे. स्वत: लता दीदींनी त्या ठिकाणी पुढाकार घेऊन आणि मंगेशकर कुटुंबीयांनी हे रुग्णालय उभं केलं. तिथल्या डॉक्टरांनी आणि कर्मचाऱ्यांनी अतिशय असंवेदनशिलतेनं प्रसुतीसाठी आलेल्या महिलेला त्या ठिकाणी दाखल करून घेण्यास नकार दिला. किंवा अधिकचे पैसे मागितले अशाप्रकारचा जो विषय आलेला आहे,

पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावर गंभीर स्वरुपाचा आरोप करण्यात येत आहे. प्रसूतीसाठी आलेल्या महिलेच्या कुटुंबाकडे दहा लाख रुपयांची मागणी करण्यात आली, पैसे न भरल्यानं या महिलेला रुग्णालयात दाखल करून घेतलं नाही, योग्यवेळी उपचार न मिळाल्यानं या महिलेचा मृत्यू झाला, असा आरोप रुग्णालयावर करण्यात येत आहे. या घटनेनंतर राज्यात वातावरण चांगलंच तापलं आहे, नागरिकांमधून संताप व्यक्त होत आहे. तनिषा सुशांत भिसे असं मृत्यू झालेल्या या महिलेचं नाव आहे. दरम्यान यावर आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. ही बातमी समोर आल्यानंतर लोकांमध्ये अतिशय चिड आहे. किमान धर्मादाय रुग्णालयांनी तरी आपली भूमिका योग्य पद्धतीनं निभावली पाहिजे, अशा प्रकारची आपल्या सर्वांची अपेक्षा आहे आणि म्हणूनच या संदर्भात मी एक हाय लेव्हल कमिटी तयार केलेली आहे. जी या घटनेचा तर तपास करेलच त्यासोबतच अशा प्रकारच्या घटना होऊ नयेत, म्हणून धर्मादाय रुग्णालयावर आपल्याला कशाप्रकारे नियंत्रण ठेवता येईल, विशेष: मेडिकल इथिक्स पैशांची चिंता न करता कशाप्रकारे आपल्याला त्यांना दाखल करून घेणं हे गरजेचं होतं. त्यामुळे इथिक्सचं पालन होतं की नाही यावर आपण लक्ष ठेवणार आहोत, आमचा मुख्यमंत्री कक्ष आहे, त्यांनी सुद्धा स्वत: या प्रकरणात लक्ष घातलं होतं, परंतु दुर्दैवानं योग्य प्रतिसाद हा त्या ठिकाणी रुग्णालयाकडून मिळालेला नाही.

## जायकवाडी उजव्या कालव्याची वितरीका फुटली, लाखो लिटर शेतात पाणी



गेवराई प्रतिनीधी गेवराई तालुक्यातुन जायकवाडी धरणाचा उजवा कालवा जातो पिकाणा पाणी मीळण्यासाठी कालव्याच्या एका बाजुने वितरीका निर्माण केल्या आहे परंतु वितरीका मधुन होणारा पाणी पुरवठा क्षमते पेक्षा जास्त सोडल्यामुळे वितरीका फुटली शेतातील उभ्या पिकात पाणी घुसल्यामुळे पिकाचे नुकसान झाल्याची घटना घडली आहे त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे या संबंधी अधिक माहिती अशी की गेवराई तालुक्यातील मौजै रेवकी गावी गट नं ११६ मधुन वितरीका क्र ३२, जाते प्रशासणानी पिकांणा पाणी मिळण्यासाठी वितरीका निर्माण केल्या आहे उजव्या कालव्याला पाणी आले आहे त्यामुळे वितरीकाणा दि २ रोजी पाणी सोडले आहे परंतु कालवा निरीक्षकांनी पाणी सोडताना क्षमतेपैक्षा जास्त पाणी पुरवठा केला त्यामुळे वितरीका फुटली पाणी शेतातील पिकात घुसलेफ यमुना बाई आसाराम जावळे, रेवकी,शिवार, यांच्या शेतात पाणी घुसले ३एक्कर लागवड केलेल्या उसाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे त्यामुळे झालेल्या नुकसानाची चा पंचनामा करुण नुकसान भरपाई द्यावी कालवा निरीक्षकांवर कारवाई करावी अशी मागणी त्यांनी केली आहे.

## ट्रॅक्टर विहिरीत कोसळून ७ महिला शेतमजुरांचा मृत्यू

### आलेगाव शिवारातील दुर्दैवी घटना ,नातेवाईकांचा आक्रोश,मृतांच्या कुटुंबीयांना ५ लाखांचे अर्थसहाय्य

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नादेड : तालुक्यातील आलेगाव शिवारात महिला मजुरांना घेवून जाणारे एक ट्रॅक्टर विहिरीत कोसळल्याने सात महिलांचा मृत्यू झाला असून तीन जण गंपीर जखमी झाले आहेत. ही दुर्दैवी घटना आज सकाळी ८ च्या सुमारास घडली. शेतातील हळद व भुईमुग काढणीचे काम नांदेड व वसमत परिसरात सुरु आहे. वसमत तालुक्यातील गुंज येथील महिला आज सकाळी एका ट्रॅक्टरमध्ये बसून आलेगाव शिवारातील एकदरा गावाजवळ असलेल्या शेतात भुईमुगचे निंदन करण्यासाठी जात होते. शेतातील पांदण रस्त्याने ट्रॅक्टर जात असतांना समोर एक छोटा खडा आला. खड्यातून ट्रॅक्टर काढत असतांना चालकाचे स्टेरिंगवरील नियंत्रण सुठल्याने ट्रॅक्टर उजव्या बाजूला असलेल्या कठडा नसलेल्या विहिरीत ट्रॉलीसह पडले. ट्रैक्टर चालकाने उडी मारल्याने तो बचावला, परंतु ट्रॉलीमधील महिला ट्रॅक्टरसह विहिरीत पडले. ट्रैक्टर विहिरीत पडल्याचे समजताच आजुबाजुचे शेतकरी व गावातील नागरिक मदतीसाठी धावले. तातडीने पार्वतीबाई गुरड (वय ३५), पूरबाई कांबळे (वय ४०) आणि सटवाजी जाधव (वय ५५) हे तीन जण गंभीर जखमी




झाले. त्यांना तातडीने बाहे काढण्यात आले. परंतु इतर महिला विहिरीतील पाण्याच्या गाळात अडकल्या. वरुन ट्रॅक्टर व ट्रॉली असल्याने त्यांना बाहेर निघता आले नाही. घटनेची माहिती तातडीने लिंबगाव पोलीस स्टेशनला देण्यात आली. घटनास्थळी आपत्ती व्यवस्थापनचे अधिकारी व कर्मचारी दाखल झाले.त्यापाठोपाठ महापालिकेच्या अग्नीशामन दलाच्या पथकालाही पाचारण करण्यात आले होते. सदरील विहिर ही ९० फुटाची असून त्यामध्ये ५० ते ५५ फुट पाणी होते. कर्मचाऱ्यांनी क्रेनच्या सह्याने पाच मोटारी लावून १५ ते २० फूट पाण्याचा उपसा करण्यात आला. त्यानंतर जेसीबी व क्रेनच्या मदतीने ट्रॅक्टर व ट्रॉली बाहेर काढण्यात आली. अग्नीशमन विभागाचे अधिकारी केरोजी दासरे यांच्या नेतृत्वाखाली अग्नीशमनचे जेवान व जीवरक्षक हे विहिरीत उतरले, त्यांनी विहिरीच्या गाळात अडकलेल्या एक-एक करुन पाच महिला व दोन मुलीने प्रेत माहेर काढले. घटनास्थळी परिसरातील नागरिक व मयतांचे नातेवाईक मोठ्या संख्येने जमा झाले होते. या दुर्घटनेत ताराबाई सटवाजी जाधव (वय ३५), धुरपता सठवाजी जाधव (वय १८), रारस्वर्त लखन बुरट (नम २५), सिमरन संतोष कांबळे (वय १८), चौत्रबाई माधव पारचे (वय ४५), ज्योती इरबाजी सरोदे (वय ३५), सपना तुकाराम राऊत (वय २५) सर्व रा.गुंज ता.वसमत यांचा मृत्यू झाला. ट्रॅक्टर चालकही पडल्याची चर्चा होती. परंतु विहिरीत कर्मचाऱ्यांनी तळापर्यंत जावून शोध घेतला असता तो काही आढळून आला नाही. घटनास्थळावरुन चालक हा पळून गेल्याची चर्चा असून तो अल्पवयीन असल्याचे सांगण्यात आले. मयत व जखमी हे गुंज येथील गावातील असून या घटनेमुळे गावावर आणि कुटुंबावर शोककळा पसरली असून लहान मुले आईच्या प्रेमाला पोरकी झाली आहेत. या घटनेने गुंज गावावर दु:खाचा डोंगर कोसळला असून एकाच गावातील ७ महिलांचा या अपघातामध्ये मृत्यू झाल्याने गावात स्मशान शांतता पसरली आहे. विशेष म्हणजे गावातील एका कुटुंबातील दोन सुना म्हणजेच सख्ख्या जावांचा या दुर्घटनेत मृत्यू झाला आहे. या दोन्ही महिलांना २-५ वर्षांची लहान-लहान मुले आहेत. त्यामुळे, कोवळ्या वयातच काळाने मोठा सूड या चिमुकल्यावर उगवल्याच पाहायला मिळत आहे. पटनेची माहिती समजताच आ. राजूभैय्या नवघरे,आ. बालाजी कल्याणकर, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, उपजिल्हाधिकारी राचिन खल्लाळ, वसमतचे उप जिल्हाधिकारी विकास माने, अग्नीशमन अधिकारी किरोजी दासरे, पोलीस उपअधीक्षक हरनियन बेन याच्यासह आपत्ती व्यवस्थापन विभागाचे अधिकारी, कर्मचारी, पोलीस कर्मचारी,वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले होते. मयतांच्या नातेवाईकांचा आक्रोश गुरु होता. सातही प्रेत विहिरीच्या बाहेर काढल्यानंतर ते एकाच ठिकाणी ठेवण्यात आले होते. त्यानंतर प्रशासनाने नातेवाईकांची समजूत घालून शवविच्छेदनासाठी रुग्णवाहिकेतून नांदेड येथील

## जिल्हास्तरीय कबड्डी निवड चाचणीचे आयोजन

जालना (वार्ताहर ) जिजामाता क्रीडा मंडळ किनगाव ता अंबड आणि क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे यांच्या वतीने शैक्षणिक वर्ष 2025-26 या वर्षा साठी आयोजित करण्यात येणाऱ्या 19 वर्ष वयोगटाच्या आतील मुले कबड्डी या खेळासाठी दिनांक 10 एप्रिल 2025 रोजी सकाळी 10.00 वाजता मंडळाच्या मैदानावर जिल्हास्तरीय कबड्डी निवड चाचणीचे आयोजन करण्यात आलेले आहे.या निवडचाचणी साठी ज्या विद्यार्थ्यांची जन्मतारीख 01.01 2007 आहे आणि बारावी पर्यंत शिकत आहे अशा जिल्ह्यातील सर्व पात्र विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा आणि निवड चाचणी मध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे व वेळेवर उपस्थित राहावे असे आवाहन मंडळाच्या वतीने संजय येळवंते, दिनेश वाघ,विठ्ठल दिवटे,रोहित बिन्नीवाले,अजय काळवणे,आकाश दिवटे इत्यादींनी केले आहे

## सुरेखा शंकर नखाते यांचे निधन



बीड : धारूर येथील ॲड.सुरज शंकर नखाते यांच्या आई सुरेखा शंकर नखाते यांचे वयाच्या ५५ व्या वर्षी अल्पशा आजाराने गुरुवार दि.३ एप्रिल रोजी सकाळी अंबाजोगाई येथील खाजगी रुग्णालयात उपचारादरम्यान निधन झाले. त्या धार्मिक वृत्तीच्या आणि मनमिळावू स्वभावाच्या होत्या. धारूर तालुक्यातील आवरगाव या मुळगावी गुरूवारी सायंकाळी ५ वाजता गावाजवळील शेतामध्ये पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, तीन मुले, सून, नातवंडे असा परिवार आहे. त्या धारुर तहसीलचे सेवानिवृत्त कर्मचारी शंकर नखाते यांच्या पत्नी, ॲड.सुरज नखाते यांच्या आई तर लोकाशाचे उपसंपादक अभिजीत नखाते यांच्या चुलती होत्या. त्यांच्या अचानक झालेल्या निधनामुळे आवरगावसह धारूर शहरामध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

# संतोष देशमुखांच्या मारेकऱ्याना फाशीच होईल गृह राज्यमंत्री योगेश कदम यांची ग्वाही



### मुख्य आरोपींचे इतरत्र स्थलांतर होणार?

गृह राज्यमंत्र्यांनी यावेळी प्रस्तुत प्रकरणातील मुख्य आरोपींचे इतरत्र स्थलांतर करण्याच्या मुद्यावर सकारात्मक प्रतिसाद दिला. पीडित कुटुंबाने या प्रकरणातील मुख्य आरोपींचे इतरत्र स्थलांतर करण्याची मागणी केली आहे. मी ही गोष्ट मुख्यमंत्र्यांच्या कानावर घालेन. मी तुरुंग प्रशासनाशीही चर्चा करणार आहे. ही केस लूज होणार नाही याची पूर्ण काळजी घेतली जाईल. ज्या कर्मचाऱ्यांवर आरोप आहेत, त्यांना समज देऊन चालणार नाही. त्यांना बडतर्फ केले पाहिजे. पोलिस प्रशासनाचे काम काय आहे हे लक्षात आणून देणे हे आमचे काम आहे, असेही योगेश कदम यावेळी पत्रकारांशी संवाद साधताना म्हणाले.

केज : राज्याचे गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी शुक्रवारी मस्साजोगला जावून मयत सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. यावेळी त्यांनी देशमुख यांच्या मारेकऱ्याना फाशीच होईल, अशी ग्वाही पीडित कुटुंबीयांना दिली. देशमुख यांच्या कन्या वैभवी हीने यावेळी त्यांच्याकडे या प्रकरणातील सर्वच संशयास्पद पोलिस अधिकाऱ्यांना सहआरोपी करण्याची मागणी केली. सरपंच संतोष देशमुख यांची गत ९ डिसेंबर २०२४ रोजी निघृण हत्या करण्यात आली होती. या प्रकरणी पोलिसांनी वाल्मीक कराड याच्यासह सुदर्शन घुले, विष्णू चाटे, जयराम चाटे, प्रतीक घुले, महेश केदार, सुधीर सांगळे आदी आरोपींना अटक केली आहे. कृष्णा आंधळे नामक एक आरोपी अद्याप फरार आहे. पोलिस त्याचा शोध घेत आहेत. या सर्वांवर मकोका अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी देशमुख कुटुंबीयांची भेट या प्रकरणात पोलिस अधिकाऱ्यांचा मोठ्या प्रमाणात हस्तक्षेप असल्याची बाबही त्यांनी गृह राज्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली. यावेळी गावकरी म्हणाले, आरोपींची गाडी वाशीच्या दिशेने जात होती. ही माहिती पोलिसांना देण्यात आली. पण त्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले. त्यामुळे या प्रकरणात वाशी पोलिस ठाण्याचे पीआय व केजच्या पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांना सहआरोपी करण्यात यावे. त्यावर योगेश कदम यांनी संबंधितांना दोषी अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्याची सूचना केली.

# संपादकीय

## जिद्द

मनुष्याला कधी कधी खूप लढावं लागतं . कधी कधी आशेचे दोर तोडावे लागतात . परावलंबित्व स्वीकारावे लागते . नदी जसे आपले ध्येय समोर ठेवून जात असते , तिला कितीही अडवलं ना तरीही ती आपला मार्ग सोडून का होईना आपले ध्येय गाठतेच . तसंच आपलेही असावे . काही काही लोकं मग स्वावलंबी होऊन दिलेला लढा जिंकण्याची जिद्द मनात बाळगून तसे वागण्याचा प्रयत्न करतात .

आयुष्यात आपण जरी हरलो असलो तरी मनात जगण्याची जिद्द असावी लागते . एखादा कॅन्सरग्रस्त रूग्ण आपण बरे होऊ या जिद्दीवरच जगत असतात . एखादा दिव्यांग आपल्या अपंगत्वावर मात करून जगण्याची जिद्द मनात बाळगून पुढे पुढे चालत असतो . एवढी ताकद आपल्या मनगटात अजून आहे असेच त्याला वाटत असते . काही करण्याची जिद्द असेल तर आपल्याला मार्ग आपोआपच सापडत असतो .

मुलांना जेव्हा एखादे यश भरभरून मिळते तेव्हा ते असंच म्हणतात की माझ्या जिद्दीवर हे यश मिळवलेले आहे . खूप कष्ट घेतले आहेत यासाठी . आपण एखादे काम हातात करायला घेतो . सतत तेच काम आपण करत राहतो . कंटाळा आला की हे काम सोडून दुसरे काम हातात घेतो . पण जिद्दी लोकांचे तसे नसते . त्यांनी एखादे काम हातात घेतले की ते पूर्ण केल्याशिवाय हातातून सोडतच नाहीत . कितीही अडचणी येवोत , अपयश येवो , कुठल्याही कारणाने ते काम जिद्दी लोक हातातून सोडतच नाहीत . संकटं येताना एकटे येत नाहीत . पण ते आपल्यातील शक्ती आणि जिद्द पाहण्यासाठीच येत असतात . जिद्दी लोक त्या कामाचा फडशा पाडल्याशिवाय राहात नाहीत .जिद्द पूर्ण करायची असेल तर मनाचा दृढ निश्चय असावा लागतो . निग्रह करावा लागतो . स्वतःच्या स्वभावाला मुरड घालून एकाग्रता वाढवावी लागते . आपण केलेले प्रयत्न मग यशस्वी होणारच ना ! एवढी जिद्द मनात असायला हवी .

आयुष्यात आपण एखादा निर्णय घेतलेला असतो . दुर्दैवाने तो निर्णय चुकतो आपला . पण तो घेतलेला निर्णय बरोबर आहे हे सिद्ध करण्यासाठी जिद्द असायला हवी .

आपण काहीतरी बनावे , काहीतरी भव्यदिव्य करावे अशी जिद्द तर प्रत्येक जणच मनात बाळगत असतो . अर्थात ते प्रत्येकाचे स्वप्न , संकल्प साकार होईलच असे नाही . कधी कधी ती ईश्वरेच्छा पण असते . एखाद्याने ठरविले की काहीही झाले तरी मी हे काम पूर्ण करणारच . त्यासाठी मला काहीही सहन करावे लागले तरी चालेल . असा दृढनिश्चय करून जिद्दीने न थांबता , न कंटाळता अथक परिश्रमाने आपले ध्येय गाठतातच .

जीवनात जर आपल्याला यश मिळवायचे असेल तर आपण करत असलेल्या कामाप्रती निष्ठा असायला हवी . आपल्याकडे तेवढा प्रामाणिकपणा असावा .त्यासाठी आदर्श व्यक्तींना जवळ करण्याची , सन्मार्गाने चालण्याची , काहीतरी चांगले करून दाखवण्याची जिद्द असायला हवी .स्वकष्ट , आपले ध्येय निश्चित करणे , स्वकार्य करण्याची जिद्द मनात असावी लागते .इतरांची ईर्षा करण्याची जिद्द मनात कधीच बाळगू नये . यश मिळाले तर त्या यशाची घमेंड असू नये मनात .जेव्हा एखादी स्पर्धा , शर्यत जिंकलात तर त्यातून आत्मिक समाधान मिळेल अशी जिद्द बाळगावी .मनात जिद्द असते . पण कधी कधी स्वतःवरच स्वतःचा विश्वास नसतो .कितीही संकटं आली तरी न डगमगता ती झेलली पाहिजेत.आपण जीवनात नकारात्मक दृष्टीने पाहायला लागलोत न आपण कधीच जिद्द पूर्ण करू शकत नाही .

खूपदा आपल्याला स्टेज डेअरिंग नसते . आपण स्टेजवर गेलो की घाबरतो . त त प प होते . पण मनात जिद्द बाळगली की आपण सहजपणे स्टेजवर वावरू शकतो . आत्मविश्वासाने बोलू शकतो . आपण मातीत पाय घट्ट रोवून ठेवलोत की अगदी निर्भीडपणे कुठेही दिमाखात उभं राहू शकतो .

स्वप्न रंजनात गुंगून जाऊन ध्येयपूर्ती होत नसते . जिद्द असली की आयुष्याची सुरुवात कुठूनही आणि कशीही करता येते . कधी कधी एकामागून एक अशी संकटांची मालिका आयुष्यात येत असते . पण त्यावर मात करून जिद्दीने पुढे गेलोत तरच आपण तरतो . आपली नाव तीराला पोहोचते . यशाचा डोंगर गाठायचा असेल तर जिद्द आणि चिकाटी सोडली नाही पाहिजे .परिस्थिती जेव्हा आपली परीक्षा घेते तेव्हाच जिद्द जन्म घेते . आपण जिद्द ठेवताना पण अशी ठेवायला हवी की आपल्या नशिबात नसलेल्या गोष्टी सुद्धा आपल्याला मिळाल्या पाहिजेत .

कु. छाया उंब्रजकर
सोलापूर
९४२३०६७९१६

# संपादकाची सावली: श्री बालासाहेब फड (एक धडपड, एक सत्य, एक प्रेरणा)

परळी तालुक्यातलं एक छोटं खेडं — कन्हेरवाडी. धुळीचे कण अंगावर खेळवत, शेतीच्या शिवारात वावरत, विठोबा नाम घेत, एक छोटा मुलगा वडीलांच्या खांद्यावर बसून जत्रा पाहत होता. त्याचं नाव होतं — बालासाहेब.

पाठशाळेच्या वळणावर आयुष्यानं त्याला शिक्षणाची नव्हे, तर अनुभवाची शाळा दिली. त्याचे आई-वडील, वारकरी परंपरेतले भक्त. रोज नामस्मरण, कीर्तन, आणि समाजसेवा — हीच घरातली संस्कृती. बालपण थोडं संकोची, पण मनात असलेली एकच जिद्द — "स्वतःचं नाव करायचं, पण त्यात कोणाचं वाईट नको."

त्याच्या घरात टी.व्ही. नव्हता, पण वर्तमानपत्र मात्र होतं. वर्तमानपत्रातल्या मथळ्यांवरून समाजात काय चाललंय, हे त्याला जाणवायचं. आणि एक दिवस तो म्हणाला —
"एव्हढंच का लिहिलंय? खरे प्रश्न का नाही उठवत?"

त्या दिवशी एका छोट्या विचारातून एक मोठा प्रवास सुरू झाला. एक स्वप्न जन्माला आलं — सत्याची सावली बनायचं...

सप्तपदी सुरू झाली – साप्ताहिक परळी संदेश:
ना मोठा कॉर्पोरेट बॅकअप, ना पत्रकारितेचा डिप्लोमा. फक्त एका जुन्या टायपरायटरवर शब्दांची उजळणी. बातमी लिहायची, विचार करायचा — "ही बातमी सत्य आहे का?", "कोणी दुखावलं जाणार का?"
आणि तरीही लिहायचं — जे खरं आहे, तेच.



हे काम म्हणजे सतीचं वाण. कारण समाजात लोक 'आपल्याला पाहिजे तेच ऐकायला' आणि 'हवं तेच वाचायला' इच्छितात. पण बालासाहेब? तो लिहायचा — जे आवश्यक आहे ते.

2016 – "सोमेश्वर साथी" चा उदय:
हे फक्त वृत्तपत्र नव्हतं, हे एक व्यासपीठ होतं. नवोदित लेखकांना जागा देणारा, विचारांना दिशा देणारा, आणि ग्रामीण भागातील "तळागाळातील आवाज" शहरांपर्यंत पोचवणारा एक जिवंत संवाद होता.
तेव्हा अनेक नव्या पिढीचे युवक म्हणू लागले —
"फड साहेब, आमचं पहिलं लिखाण तुम्ही छापलं."
पाठीशी असलेली सावली – कुटुंब:
पत्रकाराचा दिवस संपत नाही. ना ठरलेली सुट्टी, ना ऑफिस टाइम. आणि म्हणूनच त्याच्या आयुष्यात एक आधारस्तंभ – ज्ञानेश्वरीताई. ज्यांनी मुलांची जबाबदारी हसतहसत पेलली. आणि त्या घरातही संस्कार पेरले गेले. दोन मुलं – संग्राम व प्रकाश, आज दोघंही वारकरी संप्रदायात कीर्तनकार झालेत. बाबांचा आदर्श त्यांनी घेऊन व्रत घेतलंय.

संपादकाची भूमिका म्हणजे? :
...कधी तलवारीसारखी धार, कधी आईसारखा माया, कधी वादळात शांततेचा हात.
बालासाहेब हे सगळं निभावत आले. त्यांनी लेख लिहिले – वारकरी महाराजांवर, सामाजिक कार्यकर्त्यांवर, महापुरुषांवर, आणि राजकीय नेत्यांवर – पण नेहमी प्रामाणिक शब्दांत.
त्यांच्या शब्दांनी कधी जखमा उघड केल्या, कधी खोट्यांची भलामण थांबवली, कधी नवनिर्माणाची मशाल पेटवली.
समाजसेवक म्हणून ओळख:
पत्रकार असतो तेव्हा प्रश्न विचारतो, पण जेव्हा संपादक समाजसेवक असतो, तेव्हा तो उत्तरं शोधतो. म्हणूनच ते अनेक संस्थांमध्ये कार्यरत राहिले. पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष म्हणूनही त्यांची निवड झाली.

आज बालासाहेब फड यांच्या नावासोबत जोडलेलं आहे एक आदराचं, प्रेमाचं आणि प्रेरणेचं नातं. कारण त्यांनी केवळ संपादकाची भूमिका निभावली नाही, त्यांनी "सत्याची सावली" बनण्याचं व्रत घेतलं.
म्हणूनच...
"कासेची लंगोटी असेल तरी चालेल, पण नाठाळाला विचारू – तुझा खरा चेहरा दाखव..."
बालासाहेब यांच्या लेखणीने खोट्याच्या मुखवट्यांना ओळख दिली, आणि खऱ्याला शब्द दिले.
त्यांच्या या प्रवासाला अनेक आशीर्वाद!
---
हॅपी बर्थडे, बालासाहेब फड!
तुमचं आयुष्य हेच ग्रामीण भारतासाठी एक प्रेरणागाथा आहे.

**डॉ. भारत कऱ्हाड,**
**(प्राचार्य वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.)**

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळाच्या अध्यक्षपदी ज्ञानेश्वर कानडे, सरचिटणीस माजी आमदार विश्वनाथ डायगव्हाने तर कोषाध्यक्षपदी ए. बी. औताडे यांची एकमताने निवड!

## शिक्षक विरोधी भूमिकेमुळे महामंडळाच्या सभेत आमदार प्रशांत बंब यांचा जाहीर निषेध. जुनी पेंन्शन, टप्पा अनुदानसह ज्वलंत प्रश्नांच्या सोडवणूकीसाठी तीव्र आंदोलनाचा निर्णय!

जळगाव ( दिनांक 31 मार्च): महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळाच्या अध्यक्षपदी ज्ञानेश्वर कानडे, सरचिटणीसपदी माजी शिक्षक आमदार विश्वनाथ डायगव्हाणे तर कोषाध्यक्षपदी ए. बी. औताडे यांची एकमताने निवड करण्यात आली. महामंडळ कौन्सिल सभेभेने शिक्षक विरोधी भूमिका घेतल्या बद्दल आमदार प्रशांत बंब यांचा तीव्र निषेध केला.

या बाबत अधिक माहिती अशी की महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळ कार्यकारिणी कौन्सिल सदस्यांची सोमवार ३१ मार्चला जळगाव जिह्ला माध्यमिक शिक्षक/शिक्षकेत्तर नोकरांची नागरी सह. पतपेढी जळगाव येथील सभागृहात दुपारी १२ वाजता सभा संपन्न झाली. सभेच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळाचे अध्यक्ष माजी शिक्षक आमदार श्री. विश्वनाथ डायगव्हाणे सर होते. नागपूर विभागाचे शिक्षक आमदार आदरणीय सुधाकर आडबाले सर , पी.एस्.घाडगे, श्रावण बर्डे, अरविंद देशमुख, सुर्यकांत विश्वासराव, राजकुमार कदम,नानासाहेब पुंदे तसेच कार्यकारिणी सदस्य हजर होते. माध्यमिक शिक्षक व शिक्षकेतरांच्या विविध समस्यांवर चर्चा करण्यात आली. यात जुनी पेन्शन योजना, टप्पा अनुदान, संच मान्यता व त्यासंबंधीचे किचकट शासन आदेश, शिक्षकांना आश्वासित प्रगती योजना 10-20-30 लागू करणेबाबत, नवीन शैक्षणिक धोरण, सी.बी.एस्.सी. पॅटर्न , शिक्षक भरती, आदी विषयांवर चर्चा करण्यात आली. आमदार प्रशांत बंब यांनी विधानसभेत शिक्षकांविषयी घेतलेल्या भूमिकेचा जाहीर निषेध करण्यात आला. तसेच महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षक महामंडळाची सन 2025 ते 2028 साठी नवीन कार्यकारणीची निवड या सभेत श्री. ज्ञानेश्वर कानडे सर यांची अध्यक्ष म्हणून तर सरचिटणीस म्हणून माजी आमदार व्ही.यू.डायगव्हाणे तर कोषाध्यक्ष म्हणून श्री. ए.बी.औताडे सर यांची एकमताने निवड करण्यातआली. शिक्षक आमदार सुधाकर आडबाले यांनी विधान परिषदेत मांडलेल्या विविध प्रश्नांबाबत सविस्तर माहिती दिली. शिक्षण क्षेत्रातील विविध मागण्या व समस्यांबाबत सर्व घटकांना एकत्र करून पुढील शैक्षणिक वर्षापासून व्यापक स्वरूपात आंदोलन उभं करण्याचा निर्धार या सभेत व्यक्त करण्यात आला. "सर्वांना जुनीच पेन्शन योजना हवी" असे मत व्यक्त करुन NPS / RNPS/ UPS या पेन्शन योजनांवर सविस्तर माहिती यावेळी देण्यात आली. या सभेसाठी मराठवाडा माध्यमिक शिक्षक संघ, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघ व महाराष्ट्र माध्यमिक शिक्षक फेडरेशनचे प्रतिनिधी तसेच डॉ.एन्.डी.नाद्रे, क्रीडा महासंघाचे शरदचंद्र धारुळकर, यु.यु.दादा पाटील ,आर्.एच्. बाविस्कर, जे.के.पाटील,साधना लोखंडे, पुष्पा पाटील, उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार श्री. एस. डी. भिरुड सर यांनी केले.

# सिद्धेश्वर महाविद्यालयातील अर्थशास्त्र विभागाच्या वतीने संशोधन प्रकल्प लेखन कार्यशाळा संपन्न

माजलगाव प्रतिनिधी दिनांक 4 एप्रिल 2025 येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागाच्या वतीने संशोधन प्रकल्प लेखन कौशल्य कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. या कार्यशाळेसाठी प्रमुख पाहुणे म्हणून प्रा.डॉ.एन. के. मुळे अर्थशास्त्र विभाग प्रमुख तथा उपप्राचार्य सुंदरराव सोळंके महाविद्यालय माजलगाव हे होते. तर अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी हे होते. या कार्यशाळेच्या आयोजन अर्थशास्त्र विभागाच्या वतीने डॉ. महेश देशमुख आणि प्रा. मंदा मस्के यांनी केले होते. नवीन शैक्षणिक धोरणामध्ये अनेक विषयात प्रकल्प लेखन कार्य नव्याने सुरू करण्यात आलेले आहे. या अनुषंगाने अर्थशास्त्र विभागाच्या वतीने या कार्यशाळेचे आयोजन केलेले होते. या कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ. एन. के.मुळे यांनी प्रकल्पाचे लेखन कसे करावे यासंदर्भात सखोल असे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कोणताही प्रकल्प तयार करण्यासाठी अगोदर प्रश्नाचे निश्चिती करावी लागते, त्यानंतर त्या प्रश्नाच्या अनुषंगाने प्राथमिक आणि द्वितीयक माहिती गोळा करावी लागते, गोळा केलेल्या माहितीचे वर्गीकरण करावे लागते, विश्लेषण करावे लागते. त्यानंतर त्याची व्यवस्थित मांडणी करून प्रकल्पाच्या विषयाच्या अनुषंगाने निष्कर्ष व शिफारशी मांडाव्या लागतात. शेवटी संदर्भसूची द्यावी लागते. याप्रकारे प्रकल्प तयार करता येतो



असे त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून स्पष्ट केले. अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी यांनी असे स्पष्ट केले की, स्थानिक प्रश्न हे संशोधन प्रकल्पामुळे काही प्रमाणात सोडवता येणे शक्य आहे. या दृष्टिकोनातून सामाजिक शास्त्रातील प्रत्येक विषयाच्या विद्यार्थ्यांनी प्रकल्पांची निवड करावी. तसेच प्रकल्पासाठी विविध संस्थांकडून निधी मिळतो. याची माहिती त्यांनी दिली. इतिहासातील अनेक उदाहरणे देत-देत आपला प्रकल्प उत्कृष्ट कसा होईल याविषयी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चि.अशोक शिनगारे यांनी केले. स्वागत कु. गायत्री झोडगे हिने केले. प्रस्ताविक प्रा.मंदा मस्के यांनी केले तर आभार चि.अनिकेत कोह्ले यांनी मानले. का कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संगणक तांत्रिक सहाय्य प्रा. संजय चव्हाण यांनी मदत केली. या कार्यक्रमास अर्थशास्त्र विभागातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लिंबागणेश येथे महसूल प्रशासनाच्या " जिवंत सातबारा मोहिमेस प्रारंभ ;

लिंबागणेश:- ( दि.०४ ) महसूल व वनविभाग महाराष्ट्र शासनामार्फत १०० दिवस कृती आराखडा कार्यक्रम अंतर्गत " जिवंत सातबारा मोहिम बीड जिल्ह्याचे जिह्लाधिकारी अविनाश पाठक, उपविभागीय अधिकारी कविता जाधव, तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण बीड तालुक्यात हि मोहीम राबविण्यात येत असुन आज दि.०४ शुक्रवार रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे सकाळी मारोती मंदिरात ग्राम महसूल अधिकारी गणपत पोतदार आणि महसूल सेवक ललित काकडे यांनी वाचन केले.यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, माजी सरपंच बाळकृष्ण मुळे,ग्रामपंचायत सदस्य बाळकृष्ण थोरात, दामोदर थोरात,महादेव कुदळे, भालचंद्र गिरे, अनिल ढवळे, विक्रम दाभाडे, प्रमोद निर्मळ, सर्जेराव मुळे, राजेंद्र ढास, संतोष वाणी,चेतन कानिटकर, हरिओम क्षीरसागर, संजय पावले, कल्याण मुळे आदी ग्रामस्थ उपस्थित होते.


जिवंत सातबारा मोहिमेसाठी व्यापक जनजागृती व अंमलबजावणीसाठी प्रयत्नशील राहु:- चंद्रकांत शेळके , तहसीलदार बीड
- - - -
शासनाची मोहीम नागरीकांच्या हिताची असुन विहित कालावधीत ग्रामस्थांनी आपल्या सज्जाचे ग्राम महसूल अधिकाऱ्यांशी संपर्क




करून आवश्यक कागदपत्रे सादर करावीत. वारसा नोंदी अद्ययावत करून ही मोहीम गतिमान करण्यासाठी पुढाकार घ्यावा .समन्वय अधिकारी म्हणून आम्ही सातत्याने संपर्कात राहून व्यापक जनजागृती व अंमलबजावणी साठी प्रयत्नशील राहु असे बीड तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी सांगितले.

सविस्तर माहितीस्तव
- - - -
राज्य शासनाने महसूल विभागाचे महत्वाचे दस्तावेज असलेल्या सातबारा उता-यावरील सर्व मयत खातेदारांच्या वारसा नोंदी अधिकार अभिलेख्यात अद्ययावत करण्यासाठी राज्यातील सर्व जिल्ह्यात " जिवंत सातबारा मोहिम" राबविण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत.महसुलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात तशी घोषणा केलेली आहे. या मोहिमेसाठी आता कृती कार्यक्रम तयार केला असुन त्यासाठी १ एप्रिल ते १० मे २०२५ या कालावधीत जिवंत सातबारा मोहिमेंतर्गत वारसांच्या नोंदी सातबारावर घेण्यासाठी गतिमानतेने काम सुरू असुन शासनाच्या १०० दिवस कृती आराखडा कार्यक्रम अंतर्गत जिवंत सातबारा मोहिम राबवली जात आहे. या मोहिमेंतर्गत सातबारा वरील गावातील सर्व मयत खातेदारांच्या वारसांच्या नोंदीची प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. वारसांना विविध कामांसाठी आवश्यक कागदपत्रांमध्ये वारसाची नोंद विहित कालावधीत अधिकार अभिलेखामध्ये नोंद न झाल्याने अडचणी येतात. हे टाळण्यासाठी राज्यभरात जिवंत सातबारा मोहिम हाती घेण्यात आली आले.या चांगल्या योजनेची अंमलबजावणी होण्यासाठी ग्रामस्थांनी आपल्याकडील आवश्यक कागदपत्रे तातडीने वेळेत ग्राम महसूल यांच्या कडे सादर करून नोंदी अद्ययावत करून घेणे आवश्यक आहे.

# श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात वनस्पतीशास्त्र विभागांतर्गत व्यक्तिमत्व विकास या विषयावर कार्यशाळा संपन्न.



माजलगाव प्रतिनिधी दिनांक 4 एप्रिल 2025 येथील भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेच्या श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात वनस्पतीशास्त्र विभागाअंतर्गत व्यक्तिमत्व विकास या विषयावर कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यक्रमाचे मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. कमल किशोर लड्डा हे होते. त्यांनी व्यक्तिमत्व विकास म्हणजे एखाद्या व्यक्तीच्या विचार, भावना, वर्तन आणि सामाजिक आचार विचार यांचा विकास करणे. यामुळे त्या व्यक्तीची स्वतःची सर्वोत्तम आवृत्ती समोर येते. व्यक्तिमत्व विकास हा एक व्यापक आणि महत्त्वाचा विषय आहे असे सांगितले. या कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप समोर करताना उपप्राचार्य डॉ. युवराज मुळये यांनी तुमच्या वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनाला आकार देण्यात व्यक्तिमत्व विकास महत्त्वाची भूमिका बजावतो. ते तुम्हाला तुमचे सर्वोत्तम व्यक्तिमत्व सादर करण्यास मदत करते, शिवाय आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि अर्थपूर्ण नातेसंबंध निर्माण करण्यासाठी आवश्यक साधनांसह सुसज्ज करते असे म्हणाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. साधना घडसिंग यांनी केले. आभार उपप्राचार्य डॉ. गजानन होंन्ना यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी डॉ. सचिन दाभाडे, प्रा.चव्हाण यांनी मेहनत घेतली. या कार्यक्रमास वनस्पतीशास्त्र विभागातील विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

दैनिक लोकआरंभ
लोकक्रांतीचा आरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
शनिवार ५ एप्रिल २०२५
https://lokaarambh.com



# छत्रपती शिवाजी राजांचा इतिहास अभ्यासक्रमात हवा

छत्रपती शिवाजी महाराज अखंड हिंदुस्थानचे आराध्य दैवत आहे. संपूर्ण देशात त्यांनी स्वराज्य स्थापनेचा ज्वलंत संदेश दिला. मात्र पाठ्यपुस्तकात त्यांचा समग्र इतिहास नाही.राज्य मंडळाच्या इतिहासाच्या पुस्तकात विस्तृत इतिहासाचे वर्णन आहे,परंतु सी बी एस इ च्या चौथीच्या पुस्तकात महाराजांचा इतिहास अत्यंत तुटपुंजा आहे.छ.शिवाजी राजांची कार्यपद्धती, त्यांच्या लढाया, कौटुंबिक माहिती, त्यांचे लढवय्ये मावळे यांबद्दल आजच्या पिढीला पाहिजे तेवढी माहिती नाही.बालवयातच संस्कार मनावर बिंबवले जातात.शिवराय कोण होते हे आपल्या राज्यात आणि भारतात विस्तृतपणे सर्वांना माहिती असायला हवेत.त्यांच्या शस्त्रांची,गड कोट किल्ले यांची माहिती विद्यार्थ्यांना मिळायला हवी. त्यांच्या विविध कार्याची माहिती सर्व माध्यमांच्या सर्व पाठ्यपुस्तकात विस्तृत आणि ठळकपणे असायला हवी.या सर्वाचा अभ्यासक्रमात समावेश व्हायला हवा.

गणेश हिरवे

# जयभिम महोत्सवात कार्यक्रमांची रेलचेल!
## कार्यक्रमांचा आनंद घ्यावा संयोजन समितीचे आवाहन

बीड/ प्रतिनिधी विश्वरत्न, बोधीसत्व, महामानव तथा भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची 134 वी जयंती सार्वजनिक जयंती उत्सव समिती बीडच्या वतीने विविध कार्यक्रमांने साजरी होत आहे. हा जयभिम महोत्सव शुक्रवार (दि.4) एप्रिल ते 14 एप्रिल या कालावधीत साजरा होत असून या महोत्सवात धम्मदेसना, व्याख्याने, विद्रोही कवि संमेलन, रक्तदान शिबिरे, भिमगीत स्पर्धा, समता ज्योत मिरवणूक आदी विविध कार्यक्रमांची रेलचेल होणार आहे. तरी या जयभिम महोत्सवाचा सर्वांनी आनंद घ्यावा असे आवाहन डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने केले आहे. प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हंटले आहे की, बीडच्या जयभिम महोत्सवाने अवघ्या राज्याला आदर्श निर्माण करुन दिला आहे. त्या अनुषंगाने विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची 134 वी जयंती सार्वजनिक जयंती उत्सव समिती बीडच्या वतीने विविध परिवर्तनवादी कार्यक्रम हाती घेत साजरी होत आहे. या जयभिम महोत्सवाची सुरूवात शुक्रवार (दि.4) एप्रिल पासून धम्मदेसना कार्यक्रम घेवून सुरूवात झाली आहे. हा जयभिम महोत्सव 14 एप्रिल पर्यंत चालणार असून या दहा दिवसांच्या कालावधीत विविध कार्यक्रम पार पडणार आहेत. विशेषतः म्हणजे बीडच्या सार्वजनिक जयभिम महोत्सवाचे कौतूक अवघ्या महाराष्ट्राने केलेले असून हा जयभिम महोत्सव आदर्श व प्रेरणा घालून देणारा ठरलेला आहे. एवढेच नाही तर गेल्या काही वर्षांपासून बीडची आंबेडकरी जनता स्वबळावर हा जयभिम महोत्सव साजरा करीत आहे. त्यामुळे अवघ्या राज्याने बीड जयभिम महोत्सवाची प्रेरणा घेतलेली असून आता अनेक जिल्हे-गावे अशा आदर्श घालून देणाऱ्या जयंत्या काढू लागले आहेत. हा जयभिम महोत्सव परिवर्तनाच्या व आनंदाच्या वातावरणात पार पाडण्यासाठी सार्वजनिक जयंती उत्सव समितीसह आंबेडकरी समुदायातील उपासक-उपासीका तसेच प्रत्येक व्यक्ती आपआपली जबाबदारी पार पाडत आहेत. या जयभिम महोत्सवाच्या सर्व कार्यक्रमांचा शहरासह जिल्ह्यातील तमाम जनतेनी आनंद घ्यावा असे आवाहन विश्वरत्न यांच्यासह डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीसह आंबेडकरी जनतेनी केले आहे.




असे होणार कार्यक्रम...

शुक्रवार दि.4 रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे सायंकाळी 6 वाजता पूज्य भिक्खू धम्माशिल थेरो, यांची धम्मदेसना होणार आहे. शनिवार दि.5 रोजी सायं 6 वाजता संगीत रजनी रविवार दि.6 रोजी तुलसी इंग्लिस स्कुल येथे 10 ते 6 या वेळेत महापुरूष सामान्यज्ञान स्पर्धा. सकाळी 11 ते 5 यावेळत आंबेडकर भवन येथे भिमगीत गायण स्पर्धा. सोमवार दि.7 रोजी आंबेडकर भवन येथे सकाळी 11 ते 5 महापुरुष वक्तृत्व स्पर्धा, सायं 6 वाजता मडऑक आणि लढा क्रांतीचा नाटक, मंगळवार दि.8 रोजी आंबेडकर भवन येथे सकाळी 11 ते 5 महिलांचे विविध कार्यक्रम तर सायं 6 वाजता डॉ.राजेंद्र गोणारकर यांचे व्याख्यान होणार आहे. बुधवार दि.9 रोजी सकाळी 11 ते 5 विद्रोही कवि संमेलन तर सायं 6 वाजता प्रा.जयमंगल धनराज यांचे व्याख्यान होणार आहे. गुरुवार दि.10 रोजी सकाळी 11 ते 5 नृत्य स्पर्धा होणार आहे. शुक्रवार दि.11 रोजी 18 तास अभ्यास, सकाळी 8 ते 10 महात्मा फुले अभिवादन, सकाळी 10 ते 5 रक्तदान शिबीर होणार आहे. शनिवार दि.12 रोजी आंबेडकर भवन येथे सकाळी 11 ते 5 चित्रकला स्पर्धा, 6 वाजता धम्मसांगिनी रामागोरख यांचे व्याख्यान. रविवार दि.13 रोजी सेवादल मैदान डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याजवळ सायं 6 वाजता साजन बेंद्रे यांचा भिमगीत संगीत रजनी कार्यक्रम. तर रात्री 12 वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते आंबेडकर पुतळा समता ज्योत रॅली. रविवार दि.14 एप्रिल रोजी सकाळी 7 वाजता छ.शिवाजी महाराज पुतळा ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या पर्यंत प्रभात फेरी व अभिवादन कार्यक्रम तर सायंकाळी 5 वाजता छ.शिवाजी महाराज पुतळा ते डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक निघणार आहे.

# प्राध्यापकांनी लेखनाचा छंद जोपासावा – डॉ. सुरेंद्र आलुरकर सिद्धेश्वर महाविद्यालयात पदव्युत्तर मराठी विभाग प्रमुख डॉ. ज्ञानेश्वर गवते यांच्या प्रजाछत्र या पुस्तकाचे प्रकाशन

माजलगाव प्रतिनिधी सध्याच्या काळात लेखन संस्कृती लोप पावत चालली आहे त्यामुळे प्राध्यापकांनी लेखन चळवळ जोपासली पाहिजे असे प्रतिपादन भा.शि.प्र. संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलुरकर यांनी केले. श्री सिद्धेश्वर महाविद्यालयात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर जन्मत्रिशताब्दी वर्ष समिती व इतिहास अभ्यास मंडळाच्या वतीने आयोजित डॉ. ज्ञानेश्वर गवते लिखित प्रजाछत्र या पुस्तकाच्या प्रकाशन सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, खोलेश्वर शैक्षणिक संकुलाचे कार्यवाह किरण कोदरकर, केंद्रीय कार्यकारणी सदस्य प्रकाश दुगड, अमरनाथ खुर्पे, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष अभय कोकड, प्राचार्य डॉ.मुकुंद देवर्षी व पुस्तकाचे लेखक डॉ. ज्ञानेश्वर गवते उपस्थित होते.

पुढे बोलताना डॉ. सुरेंद्र आलुरकर म्हणाले की, प्राध्यापकांनी सतत अशी नवनिर्मिती करत राहिले पाहिजे म्हणजे त्यांच्या बुद्धीला चालना मिळून नवीन-नवीन विचार प्रवाह समाजात चांगल्या प्रकारे पसरविले जातील. त्याचा प्रचार-प्रसार केला जाईल. गेल्या अनेक वर्षांमध्ये भारतात नवीन शोध विज्ञानात बऱ्याच अंशी जन्माला आलेले नाहीत. या पाठीमागचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे संशोधन वृत्तीकडे आजचा प्राध्यापक वळत नाही. फक्त नोकरी पुरते न पाहता जर प्राध्यापकांनी संशोधन वृत्ती जोपासली तरच शैक्षणिक विकास होऊ शकतो असे ते म्हणाले.

याप्रसंगी भा.शि.प्र.संस्थेचे कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य शुभेच्छपर मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, आपली हिंदू विचारधारा ही समाजात मोठ्या प्रमाणात आपण वाढवली पाहिजे. आजच्या काळात माणसाच्या मनातील भावना विकृत होत चालल्या आहेत अशा वेळेस एखादे पुस्तक आपल्याला वेगळी विचारसरणी देऊ शकते. अहिल्याबाई होळकर यांनी त्यांच्या काळामध्ये जे कार्य करून ठेवले आहे ते आज खरोखरच समाजास आदर्शवत व दिशादर्शक असे आहे. म्हणूनच डॉ. ज्ञानेश्वर गवते यांनी अहिल्याबाई होळकर यांच्या जीवनावर प्रजाछत्र हे पुस्तक प्रकाशित केले ही बाब संस्थेच्या दृष्टीने अभिमानास्पद असल्याचे ते म्हणाले.

याप्रसंगी खोलेश्वर शैक्षणिक संकुलाचे कार्यवाह किरण कोदरकर यांनी देखील आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, आजचा प्राध्यापक खरोखरच असे लेखन जे समाजास हवे आहे ते करत राहिला तर समाजाचा योग्य दिशेने विकास झाल्याशिवाय राहणार नाही.

याप्रसंगी केंद्रीय कार्यकारणी सदस्य प्रकाश दुगड यांनी देखील आपले विचार व्यक्त करताना सांगितले की, अहिल्याबाई होळकर यांनी स्थापत्यशास्त्राचे वेगवेगळे आयाम समाजात घालून दिले आहेत. त्यांनी केलेले कार्य हे अद्वितीय असे आहे त्यांचा आदर्श आजच्या पिढीने घेणे हे खूप महत्त्वाचे आहे.




याप्रसंगी केंद्रीय कार्यकारणी सदस्य अमरनाथ खुर्पे यांनी देखील शुभेच्छा पर मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, डॉ. ज्ञानेश्वर गवते हे अत्यंत कठीण परिस्थितीतून त्यांची आज देखील लेखन शैली जपत आहेत त्यांनी वेगवेगळी साहित्य निर्मिती करून खऱ्या अर्थाने साहित्य क्षेत्राचा विकास केला आहे. संस्थेमध्ये मिळालेल्या संधीचे त्यांनी सोने केले आहे. असे गौरवोद्गार काढले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मुकुंद देवर्षी यांनी केले. त्याप्रसंगी त्यांनी महाविद्यालयातील प्राध्यापकांनी डॉ. ज्ञानेश्वर गवते यांचा आदर्श घेऊन जास्तीत जास्त प्राध्यापकानी सध्याच्या काळात लिहिते झाले पाहिज असे म्हणाले.

प्रजाछत्र या पुस्तकाविषयीची भूमिका प्रा. लक्ष्मीकांत सोन्नर यांनी विस्तृतपणे मांडली. तसेच पुस्तकाचे लेखक डॉ.ज्ञानेश्वर गवते यांनी देखील आपले मनोगत व्यक्त करताना संस्था व महाविद्यालयाने त्यांच्या या लेखन चळवळीस प्रेरणा देत प्रकाशनाचा कार्यक्रम आयोजित केला त्याबद्दल संस्था व महाविद्यालयाच्या प्रती कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उपप्राचार्य डॉ .युवराज मुळये यांनी केले तर आभार उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना यांनी मानले. या कार्यक्रमास उपप्राचार्य प्रा.अंकुश साबळे, पर्यवेक्षक प्रा.परमेश्वर खेत्री, कार्यालयीन अधीक्षक श्री. विजय कुलकर्णी तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

# निवडणूक कामकाजातील सरप्लस शिक्षकांना उन्हाळी सुट्टी मिळायला हवी

सध्या मुंबईतील अनेक निवडणूक कार्यालयात असंख्य शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी कामकाज पहात असून नियमित शिक्षकांना मे महिन्यात मिळणारी उन्हाळी रजा निवडणूक कामकाज पाहणाऱ्या शिक्षकास देखील देण्यात यायला हवी. रेग्युलर शाळेत शिकविणाऱ्या शिक्षकांना नियमाप्रमाणे २ मे ते १४ जून पर्यंत उन्हाळी सुट्टी मिळते. अनेक शिक्षक सध्या संच मान्यतेच्या नवीन नियमामुळे अतिरिक्त ठरत असून त्यांना निवडणुकीच्या कामाला जुंपण्यात आले आहे.पण त्यांना उन्हाळी सुट्टीसाठी दरवर्षी आदेश निघण्याची वाट पहावी लागते.अनेक शिक्षक संघटना जिल्हाधिकारी मुंबई यांना यासाठी भेटून निवेदन देत असतात.मागील निवडणुकीत मुंबईतील बहुसंख्य शाळांमधील जवळपास पाच हजारांहून अधिक शिक्षकांना बोलवण्यात आले होते. त्यातील अनेकजण आजही निवडणूक ऑफिसमध्ये कर्तव्यावर आहेत. अतिरिक्त असले तरी शिक्षकांना नियमाप्रमाणे सुट्टी मिळायला हवी यासाठी शिक्षक संघटना आणि शिक्षक आग्रही आहेत.

**गणेश हिरवे**
**जोगेश्वरी पूर्व**

# महापुरुष वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन
## जयभिम महोत्सवः विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे

बीड/प्रतिनिधी बीड शहरात, सार्वजनिक जयंती उत्सव समितीकडून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 134 व्या जयंती निमित्ताने महापुरुष वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. सदरील स्पर्धा डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे सोमवार (दि.7) रोजी सकाळी 11 ते 5 यावेळेत आयोजित करण्यात आली आहे.या स्पर्धेत शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घ्यावा असे आवाहन डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने केले आहे.



महापुरुष वक्तृत्व स्पर्धेत युगपुरुष- महाराजा सयाजी गायकवाड किंवा राजर्षी शाहू महाराज, राष्ट्रपिता क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले, संविधान शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर,साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे, त्यागमूर्ती माता सावित्रीबाई किंवा माता रमाई यांच्याविषयी प्रश्न विचारले जाणार आहेत.

या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी, इयत्ता 6 वी ते 8 वी कोणतेही शुल्क नाही. मात्र इयत्ता 9 वी ते 10 वी पन्नास रुपये शुल्क, खुला गट 11वी च्या पुढे शंभर रुपये शुल्क आकारले आहेत. महापुरुष वक्तृत्व स्पर्धेसाठी आपले नाव नोंदविण्यासाठी प्रा.बाळासाहेब गव्हाणे 9860450201, सुमेध जोगदंड 9422332295, प्रा.अशोक गायकवाड 9766903901, प्रा.राम गायकवाड 9423203199, महादेव इनकर 9420171177 ,सचिन वडमारे 9028460102 यांनासंपर्क साधावा. असे आवाहन डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती यांनी केले आहे.

# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती पाली अध्यक्षपदी महेंद्र वीर

मौजे-पाली भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ वी सार्वजनिक जयंती उत्सव आयोजनासाठी नालंदाबौद्ध विहार पाली येथे बैठकीचे आयोजन करण्यात येऊन सार्वजनिक जयंती महोत्सव समितीच्या अध्यक्षपदी सर्वानुमते महेंद्र रघुनाथ वीर, उपाध्यक्ष अनिकेत बाळू वीर, सचिवपदी प्रशांत जालिंदर गायकवाड,सहसचिव आदेश अशोक वीर,संघटक आत्माराम वाघमारे, सहसंघटक आदित्य धोंडीराम वीर,तर सदस्य म्हणून ऋतिक वीर, रोहित गायकवाड, विजय वीर ,अजय संजय वीर, संदीप गरुड ,राजेश वाकळे, निखिल वाघमारे ,रोहित सोनवणे, विजय वीर,यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. यानिमित्ताने दिनांक २७ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी सात वाजता महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन तसेच सायंकाळी ७ वाजता भिमशहीर मेघानंद जाधव यांचा भीम गीत गायनाचा दणदणीत कार्यक्रम होईल. तसेच २८ एप्रिल रोजी रात्री ६ वा. गावातील मुख्य रस्त्यावरून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे भव्य मिरवणूक निघणार आहे. असे या बैठकीत नियोजन करण्यात आले.या बैठकीस प्रमुख मार्गदर्शक म्हणून श्रीराम वीर (ग्रामसेवक),बाबासाहेब वीर,संदी



# आत्मविश्वास यशाचा पाया पुस्तकाचे प्रकाशन संपन्न

गणेश हिरवे मुंबई प्रतिनिधी
कल्याणः खर्डीकर शिक्षण प्रसारक मंडळाचे खजिनदार आणि परदेशी भाषा प्रशिक्षक ॲड संकेत खर्डीकर यांच्या म आत्मविश्वास यशाचा पाया म या पुस्तकाचे प्रकाशन स्वामी समर्थ प्रगट दिनाचे निमित्याने आचार्य अत्रे रंगमंदिर येथे पार पडले. सदर पुस्तक प्रकाशन समारंभास माजी आमदार व लेखक लहू कानडे, माजी शिक्षण विभाग संचालक अनिल अंधारे , फिल्म डायरेक्टर अजय दीक्षित, शिक्षक संघटना अध्यक्ष सुधीर घागस, मुथा स्कूल आणि कॉलेज चे संस्थापक प्रकाश मुथा , शिक्षण सेवाव्रती डॉ सुनील खर्डीकर, उद्योजिका संगीता खर्डीकर , राष्ट्रीय स्तरावरील बॅडमिंटनपटू करिश्मा खर्डीकर आणि लोकप्रिय अभिनेत्री पल्लवी पाटील प्रमुख पाहुणे या नात्याने उपस्थित होत्या.सुप्रसिद्ध अभिनेत्री पल्लवी पाटील यांनी आपल्या शुभेच्छापर भाषणात असे सांगितले की, ङ्ग गेल्या ३१ वर्षांपासून २५००० हून अधिक विद्यार्थी घडविणाऱ्या खर्डीकर क्लासेसम ध्ये उत्तम निकाल ही परंपरा आहे.



स्वामींच्या कृपेने आणि आशिर्वादाने येथे विद्यार्थ्यांवर शिक्षणासोबत उत्तम संस्कार दिले जातात. आजपर्यंत २००० हून अधिक विद्यार्थ्यांना ८० टक्क्यांहून अधिक तर ३०० विद्यार्थ्यांना ९० टक्क्यांहून अधिक गुण प्राप्त झाले आहेत. त्यामुळे कल्याणमध्ये सुरू झालेल्या या नवीन शाखेचा सर्वांनी लाभ करून घ्यावा. पालकांनी आपल्या पाल्याला संस्कारक्षम बनविण्यासाठी येथे आवर्जून प्रवेश घ्यावा.

या प्रसंगी कल्याणमधील मुख्याध्यापकांचा म कार्यकुशल मुख्याध्यापकफ तसेच विविध क्षेत्रातील म ान्यवरांचा म सहकार्यरत्न पुरस्कार म देऊन सन्मान करण्यात आला. सिद्धांत प्रोडक्शन निर्मित आणि खर्डीकर शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या म ही स्वामींची इच्छाफ या नाट्यप्रयोगाचे या वेळी आयोजन करण्यात आले होते. या नाट्यप्रयोगास रसिकांचा उस्फुर्त प्रतिसाद मिळाला होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ योगेश जोशी यांनी केले तर आभार प्रदर्शन हेमंत नेहते यांनी केले.

# कडू शेवगा या ग्रामीण कथा संग्रहास साहित्य रत्न.
## लोकशाहिर आण्णा भाऊ साठे राष्ट्रीय वाङ्मय पुरस्कार जाहिर.

औरंगाबाद छत्रपती संभाजी नगर येथील जेष्ठ साहित्यिक श्री तात्याराव पुंजाबा पवार,यांच्या कडू शेवगा या ग्रामीण कथासंग्रहात मातंग साहित्य परिषद पुणे यांचे तर्फे दिला जाणारा साहित्य रत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे पुरस्कार जाहिर करण्यात आला आहे. येत्या तेरा एप्रील रोजी संस्थेच्या पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात म.ज्योतिबा फुले व परमपूज्य भारत रत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमीत्त पद्मश्री गिरीशजी प्रभुणे, यांच्या अध्यक्षतेखाली आणि राज्यसभेचे माजी सदस्य विनय जी सहस्त्रबुद्धे यांचे शुभ हस्ते व मातंग सा.परिषदेचे अध्यक्ष डॉ.धनंजय भिसे व इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थिती मध्ये प्रदान करण्यात येणार आहे.



# चैत्र. सण आणि बहर..

चैत्र आल्याची खूण कोकीळ कुहू कुहू करत आपल्या गोड आवाजात आंब्या भोवती रुंजी घालत गात असतो. कुठेकुठे बाळ कैऱ्या लागलेल्या असतात.तर बऱ्याच आंब्याचा मोहोर हवेत आपला सुगंध मिसळत असतो. नुकतीच थंडी सरलेली असते.धुळवळ,रंगपंचमी सरली असते. पळस कडुलिंब फुललेला असतो.त्यालाही फुलं आलेली असतात. हवेत अधून मधून गरम झूळ्का येत असतात.पण मध्येच एक सुखद समीरांची लय भरली लहर येऊन मनाला सुखावते गुढीपाडवा सुखाची सय घेऊन येतो.रामनवमी, चैत्रगौर,अक्षय तृतीया सगळे सण एका मागोमाग आपली हजेरी लावून जातात. श्रीखंडपुरी., पंजिरी, पन्हं, चींचवणी, आमरस.आपला ठसा उमटवून जातो.. हलेकेच उन वाढत जाते. वाळ्याच्यां सरबताची,थंड माठातल्या पाण्याची आठवण येते. मोग-याचा गंध मनाला मोहवून जातो. अनेक आठवणींना उजाळा देत आंबट गोड कैरी अनेक रुपात आपल्या जवळ येते. तक्कू,पन्हे,लोणचे,चुंदा सखरांबा. गुळांबा नवे नवे मोहक रूप लेऊन कैरी घरात शिरते मग मनात शिरते.आंबा डाळ तर जिभेवर बसते.आंबट गोड.तिखट खमंग चव ओठावर रेंगाळते. मग कधी आठवतात उन्हाळ्यातला कुलरचा थंड वारा. संध्याकाळी झाडाला दोर बांधून घेतलेले झुले.रात्री अंगणातली जेवणं,गच्चीवर पाणी टाकून अंथरूण टाकणं मनाचा अन कण सुगंधित होई.रात्री चांदण्या मोजत थंड हवेत. निशेच्या कुशीत शिरतांनाची मजा काही वेगळीच असे. खूप समृध्द आणि सुखद क्षण आमच्या पिढीने उपभोगले. उन्हाळ्याची सुट्टी,कच्चा चिवडा सोबत पत्ते,गाणी, भेंडया ,भावला भवलीची लग्न.कितीतरी मनमोहक आठवणी हा चैत्र घेऊन येतो.मनात अजूनही रुंजी घालत .चला नव्या विचारांची ,ज्ञानाची गुढी उभारा म्हणून साद घालतो.

**अनुपमा मुंजे**

# शिवप्रेमी प्रतिष्ठानच्या वतीने बालजल्लोष चे आयोजन

गणेश हिरवे मुंबई प्रतिनिधी शिवप्रेमी प्रतिष्ठान चे संस्थापक शाखप्रमुख अजित भोगले यांच्या संकल्पनेतून रामनगर जयकोच लक्ष्मण नगर गोरेगाव पूर्व जवळील मोकळ्या मैदानात बालजल्लोष मेळाव्याचे आयोजन दिनांक ५ एप्रिल रोजी संध्याकाळी ५ ते ९ वाजेपर्यंत करण्यात आले असून यावेळी मुलांना खेळण्यासाठी विविध गेम्स, कोल्डड्रिंक्स, फूड विनामूल्य देण्यात येणार आहे.जास्तीत जास्त पालकांनी आणि मुलांनी या फन फेअर चा आनंद लुटावा असे आवाहन भोगले आणि त्यांच्या टीम ने केलं आहे.




# जनजागृती सेवा संस्थेच्या वतीने कल्याण येथील आधारवाडी कारागृहातील कैद्यांना वाचनासाठी पुस्तके भेट

कल्याण(प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर)!वाचाल तर वाचाल!मोबाईल,पीडीएफ,इलेक्ट्रॉनिक मिडीया,कॉम्पीटरच्या या युगात वाचन संस्कृती कमी होत चाललेली आहे.वाचनाची आवड निर्माण झाली पाहिजे,तो गुन्हेगार असला तरी शिक्षा भोगण्यासाठी कारागृह येतो. कारागृहातील अशा कैद्यांचा वेळ जात नाही. कारागृहातील कैद्यांचा वेळ सत्कारणी लागावा म्हणून सामाजिक क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणा-या जनजागृती सेवा संस्थेच्या वतीने कल्याण येथील आधारवाडी कारागृहातील कैद्यांसाठी पुस्तके भेट देण्याचा कार्यक्रम नुकताच संपन्न झाला.सर्व प्रथम जनजागृती सेवा संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांनी उपस्थित मान्यवरांची ओळख करुन दिली.त्यानंतर कल्याण आधारवाडी कारागृहाचे उप अधिक्षक यु.पी.पाटील,वरिष्ठ पोलिस निरीक्षक अभिजीत कोळी यांजकडे संस्थेच्या वतीने दिवाळी अंक,प्रवास वर्णन,ललित लेख संग्रह,काव्यसंग्रह,कथा संग्रह अशा विविध प्रकारची पुस्तके सुपूर्द करण्यात आली. याप्रसंगी जेष्ठ समाजसेवक अरविंद सुर्वे,महिला उत्कर्ष समिती महाराष्ट्र च्या कार्याध्यक्षा श्रुती उरणकर,मुंबई ॲन्टीपायरसी सेल चे मुख्य तपाशी अधिकारी रामजित गुप्ता,कल्याण-डोंबिवली महानगरपालिका शिक्षण समितीचे माजी सभापती तसेच बिर्ला कॉलेजचे माजी उप प्राचार्य प्रा.उदय सामंत सेवा सेवा समाधान ट्रस्ट च्या विश्वस्त मानसी मोने,शब्दसुमने साहित्य मंच च्या अध्यक्षा अनिता कळसकर,बहिणाबाई ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष सुनिल इंगळे,बदलापूर येथील उत्कर्ष सेवा मंडळाचे सचिव विलास शिंदे,सेवा निवृत्त बँक अधिकारी रविंद्र कुलकर्णी,समाजसेविका गायत्री पांडे आधारवाडी कारागृहातील वैद्यकिय अधिकारी डॉ.मंगेश जाधव,कारागृह लिपिक शुभम भांगे, महिला पोलिस आदी मान्यवर उपस्थित होते.कारागृह उप अधिक्षक यु.पी.पाटील यांनी कारागृहातील वास्तव,दिनक्रम,कार्यशैली या संदर्भात सविस्तर माहिती दिली.तसेच वरिष्ठ पोलिस निरीक्षक अभिजीत कोळी यांनीही पहिल्यापासूनच संस्थेला योग्य ते सहकार्य व मार्गदर्शन केले. उपस्थित मान्यवरांच्या वतीने कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेचे माजी शिक्षण समिती सभापती तसेच बिर्ला कॉलेजचे माजी उप प्राचार्य प्रा.उदय सामंत यांनी मनोगत व्यक्त केले.विशेष म्हणजे हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी आंतरराष्ट्रीय कीर्तिचे व्याख्याते,समुपदेशक,लेखक डॉ.महेश अभ्यंकर यांचे बहुमोल सहकार्य लाभले.शेवटी संस्थेचे अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर यांच्या हस्ते यांनी सर्वांचे आभार मानले.




# ज्येष्ठ अभिनेते मनोज कुमार यांना भावपूर्ण श्रद्धांजली

 हिंदी चित्रपटसृष्टीतील सुवर्णकाळ घडवणारे ज्येष्ठ अभिनेते आणि सुप्रसिद्ध चित्रपट निर्माते मनोज कुमार उर्फ 'भारत कुमार' यांचे वयाच्या ८७व्या वर्षी निधन झाले. त्यांनी मुंबईतील धीरुभाई अंबानी रुग्णालयात अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या जाण्याने संपूर्ण चित्रपटसृष्टीत शोककळा पसरली असून, अनेक चाहत्यांसाठी ही अतिशय दुःखद घटना ठरली आहे.

 मनोज कुमार यांचे खरे नाव हरिकिशन गिरी गोस्वामी असे होते. त्यांचा जन्म २४ जुलै १९३७ रोजी ब्रिटिश भारतातील (सध्याच्या पाकिस्तानमधील) अबोटाबाद येथे झाला. देशाच्या फाळणीनंतर त्यांचे कुटुंब भारतात आले आणि ते दिल्लीला स्थायिक झाले. त्यांच्या अभिनय कारकिर्दीची सुरुवात १९५७ साली "फॅशन" या चित्रपटातून झाली. मात्र, त्यांना खरी ओळख मिळाली ती १९६५ सालच्या "शहीद" चित्रपटातून, जो भगतसिंग यांच्या जीवनावर आधारित होता.

 मनोज कुमार हे 'भारत कुमार' म्हणून ओळखले जात असे कारण त्यांच्या चित्रपटांमध्ये देशभक्तीचा खुपच प्रभाव दिसून येत असे.



त्यांनी अभिनय केलेले आणि दिग्दर्शित केलेले "पूरब पश्चिम" (१९७०), "क्रांती" (१९८१), "उपकार" हा चित्रपट विशेष प्रसिद्ध ठरला, ज्यामध्ये त्यांनी "मेरे देश की धरती सोना उगले" हे अजरामर गीत दिले.

 मनोज कुमार यांच्या अभिनय आणि योगदानाबद्दल त्यांना अनेक प्रतिष्ठित पुरस्कार मिळाले. १९९२ साली त्यांना 'पद्मश्री' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. २०१६ साली भारत सरकारने त्यांना "दादासाहेब फाळके पुरस्कार" देऊन गौरवले. त्यांच्या चित्रपटांमधील देशभक्ती आणि सामाजिक संदेशामुळे ते भारतीय प्रेक्षकांच्या हृदयात घर करून राहिले.

 शेवटचा निरोप त्यांच्या निधनामुळे भारतीय चित्रपटसृष्टीतील एक सुवर्णयुग संपले आहे. त्यांचे योगदान अनमोल असून त्यांच्या चित्रपटांच्या माध्यमातून ते कायम स्मरणात राहतील. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो, हीच आई अंबाबाई चरणी प्रार्थना. भावपूर्ण श्रद्धांजली! 

 **संजय पाटील**

# सार्वजनिक बांधकाम विभागातील शेख शफीभाऊ यांचा लिंबागणेश ग्रामपंचायत मार्फत सेवानिवृत्ती निमित्त सत्कार समारंभ



लिंबागणेश:- ( दि.०३) बीड तालुक्यातील लिंबागणेशचे भुमिपुत्र शेख शफीभाऊ शेख अब्दुल हे नियत वयोमानानुसार पाटोदा सार्वजनिक बांधकाम विभाग येथुन निवृत्त झाले असुन आज दि.०३ गुरुवार रोजी ग्रामपंचायत कार्यालयात ग्रामपंचायतीच्या वतीने शाल , श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन हृद्य सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच बालासाहेब जाधव होते.कार्यक्रमाची प्रस्तावना व सुत्रसंचलन भिम टायगर ग्रुप जिल्हाध्यक्ष रविंद्र निर्मळ यांनी केले. शेख शफीभाऊ यांचे वर्गमित्र निवृत्त अभियंता गणपत तागड यांनी तसेच पत्रकार हरीओम क्षीरसागर,माजी सरपंच बाळासाहेब मुळे, ग्रामपंचायत सदस्य शेख समीर, रमेश गायकवाड यांनी आपले मनोगत व्यक्त केले. डॉ.गणेश ढवळे यांनी शेख शफीभाऊ यांनी केलेल्या सेवेचा व त्यांच्या कार्याचा गुणगौरव करीत असताना त्यांच्या सेवानिवृत्ती नंतरचा काळ सुखी, समृद्धी, आनंदाने जावो व त्यांना निरोगी दीर्घायुष्य लाभो यासाठी शुभेच्छा दिल्या.सत्कारमूर्ती शेख शफीभाऊ यांनी सत्काराला उत्तर देताना सार्वजनिक बांधकाम विभाग नांदेड जिल्ह्यातील धर्माबाद तालुक्यातील भोकरदन सार्वजनिक बांधकाम उपविभाग याठिकाणी २६ वर्षे सेवा केल्यानंतर १५ वर्षे बीड जिल्ह्यातील पाटोदा याठिकाणी ३१ मार्च रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती झाल्याचे सांगताना शासकीय नोकरी करत असताना गावच्या मातीची ओढ , त्यांना आलेले अनुभव कथन केले. ग्रामपंचायत मार्फत करण्यात आलेल्या सत्कार समारंभाबद्दल सरपंच आणि ग्रामपंचायत सदस्यांचे आभार मानले. यावेळी शुभेच्छा देण्यासाठी माजी सरपंच राजेभाऊ गिरे, संदिप मंडलिक, बाळकृष्ण थोरात,ग्रामपंचायत सदस्य श्रीहरी निर्मळ , दामोदर थोरात, महादेव कुदळे, अशोक जाधव, अँड . गणेश वाणी,संतोष भोसले, अशोक वाणी,दादा गायकवाड, शेख खाजु,सय्यद रफिक,शेख अकबर मिस्त्री, आरूण ढवळे, राजेंद्र ढास ,अमोल जाधव ,राजेभाऊ आगवान आदि ग्रामस्थांची मोठ्या प्रमाणावर उपस्थिती होती.

डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर
मो.नं.८१८०९२७५७२

# गेवराई तहसीलकडून घरकुल बांधकाम करणाऱ्यांनाही वाळूसाठा केल्याची नोटीस

बीड । वाळू माफीयांना अद्दल घडविण्यासाठी आणि जिल्ह्यातील तुरटी वाळू वाहतूक रोखण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी पुढाकार घेतला आहे मात्र कारवाई करत असताना प्रशासनाचा अजब कारभार समोर येत आहे. गेवराई तहसील कडून वाळू साठेदारांना नोटीसा काढण्यात आल्या आहेत. मात्र या दिवशीचा घरकुलधारकांनाही करण्यात आली असून बांधकामासाठी त्यांनी आणलेल्या वाळूला वाळू साठा केल्याचे सांगण्यात येत आहे. अशा जवळपास २०० पंचनामे तहसील मार्फत करण्यात आले असून अनेकांना नोटिसा बजावल्या आहेत. गेवराई प्रशासनाच्या अजब कारवाईची सगळीकडे चर्चा होत असून, घरकुल धारकांनी जर वाळू आणली नाही तर बांधकाम कसे होणार ? असा साधा प्रश्न प्रशासनाच्या लक्षात आला नसल्याने आश्चर्य आणि संताप व्यक्त केला जात आहे. बीड जिल्ह्यामध्ये वाळू साठा आणि चोरटी वाहतूक अनेक वर्षापासून सर्रासपणे होत आली आहे. जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी वाळू माफी यांना रोखण्यासाठी विविध



प्रकारच्या उपाययोजना केल्या आहेत. यापूर्वी त्यांनी सीसीटीव्ही फुटेज बघत चोरटी वाहतूक करणाऱ्या टिप्परधारका कोट्यावधी रुपयांचा दंड ठोठावला. प्रशासनातील अधिकाऱ्यांना आणि पथकांना कडक कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. आता जिल्हाधिकारी यांनी ज्यांच्याकडे वाळू साठे आहेत अशा वाळू माफी यांना शोधून साठा कारवाईच्या प्रमाणात दंड ठोकण्याचा आदेश प्रशासनाला दिला आहे. जिल्हाधिकारी यांनी एक एप्रिलला काढलेल्या आदेशाप्रमाणे तहसील प्रशासन कामाला लागले आहे. तहसील प्रशासनाकडू न म्हणजेच तहसीलदारांकडून अशा वाळू साठा धारकांना शोधून त्यांना नोटीसा काढल्या जात आहेत आणि दंड ठोटावला जात आहे. यामध्ये गेवराई तहसील प्रशासनाने मात्र अजबच कारभार केल्याचे समोर येत आहे. गेवराई तालुक्यामध्ये ज्यांच्या घरकुलांना मंजुरी आली आहे, त्या घरकु लधारका कडू न बांधकामास सुरुवात करण्यात आली आहे. यासाठी त्यांनी बांधकाम साहित्य आणले असून वाळू सुद्धा त्यांनी घेतली आहे. मात्र गेवराई तहसील ने २०० ठिकाणी पंचनामा केला असून अवैध वाळू साठा केलाचा ठपका ठेवण्यात आला आहे. घरकुल धारक हे अधिकृत आहेत आणि स्वतः शासन त्यांना ५०० ब्रास वाळू मोफत देण्याची एकीकडे घोषणा करीत आहे. असे असताना अशा घरकुल बांधकाम करणाऱ्यांनाच प्रशासनाने वाळू साठा केल्याच्या नोटिसा धाडल्या असून, दंडही आकारला आहे. सुमारे दोनशे पंचनामे प्रशासनाकडून करण्यात आले असून, आणि त्यांना नोटीसा पाठविल्या आहेत आणि नोटीसा पाठविण्याची ही प्रक्रिया अद्यापही सुरू आहे. जर वाळू साठा म्हणून घरकुलधारकांनाच टार्गेट केले जात असेल तर या शासकीय योजनेतून मंजूर झालेली घरे बांधायची की नाही असा प्रश्न निर्माण झाला आहे. हा अजब कारभार सुरू असताना तहसीलदार यांचे लक्ष आहे की नाही, जिल्हाधिकारी यांनी खरे खोटे न बघता सरसकट नोटीसा काढायला सांगितले आहे की काय आणि घरकुलधारकांच्या बाबतीत जिल्हाधिकाऱ्यांचे काय मत आहे या बाबत सध्या जोरदार चर्चा होत आहे. वाळू साठा करणारे वाळू माफिया राहिले दुसरीकडेच मात्र जे गोरगरीब स्वतःचे घर बांधण्यासाठी वाळू घेऊन आले आहेत त्यांच्यावरच कारवाईचा बडगा उचलला जात आहे. प्रशासन एवढ्या आंधळापणाने कसे काय काम करू शकते असा प्रश्न यामुळे निर्माण झाला आह

## घोडदे गावाचे ग्रामदैवत श्री बहीरमदेव महाराजांची पारंपरिक गळगोंधळ यात्रा - एक श्रद्धेचा जागर

संजय पाटील,यंदा ११ एप्रिल २०२५ रोजी, चैत्र शुद्ध पौर्णिमेच्या पवित्र दिवशी, धुळे जिल्ह्यातील घोडदे गावामध्ये ग्रामदैवत श्री बहीरमदेव महाराजांची वार्षिक यात्रा व गळगोंधळ मोठ्या उत्साहात साजरी होणार आहे. ही यात्रा केवळ एक धार्मिक सोहळा नसून, श्रद्धा, भक्ती आणि परंपरेचा संगम आहे. या दिवशी घोडदे गावात भक्तांनी फुलून जाणारा उत्सव पाहायला मिळतो.

**✻ नवस फेडण्याची परंपरा**

या यात्रेतील एक विशेष आकर्षण म्हणजे गळगोंधळाची परंपरा. विशेषतः ज्या महिलांनी नवस केला असतो, त्या पारंपरिक वेशात देवीसारख्या सजून आपल्या घरातून मिरवणूक सुरू करतात. ही मिरवणूक गावभर फिरवली जाते व अखेरीस श्री बहीरमदेव महाराजांच्या मंदिराच्या पायरीजवळ येते. येथे त्या महिलांच्या पाठीवर गळ टोचला जातो आणि मंदिराला पाच प्रदक्षिणा घालून नवस फेडण्यात येतो. त्यानंतर त्या महिलेला पुन्हा मिरवणूक काढून घरी आणले जाते.

**✻ दैत्यबळीची परंपरा**






यात्रेच्या दिवशी चार बोकड व एका मेंढ्याचा बळी दिला जातो. हा बळी दैत्यबळी म्हणून ओळखला जातो. स्थानिक दंतकथेप्रमाणे, श्री बहीरमदेव महाराज हे सप्तश्रृंगी देवीचे बंधू मानले जातात. एकदा दैत्यांनी बहीरमदेवांवर आक्रमण केल्यावर सप्तश्रृंगी देवी त्यांच्या मदतीला धावून आली व दैत्यांचा नाश केला. त्याचीच स्मृती म्हणून दरवर्षी चैत्र पौर्णिमेच्या आदल्या दिवशी बहीरमदेव महाराजांची यात्रा भरते व बळीची ही परंपरा पाळली जाते.

**✻ श्रद्धेचा चमत्कार - १९६७ चा पुर**

१९६७ साली घोडदे परिसरात आलेल्या कान नदीच्या महापुरामध्ये अनेक गावे, झाडे व मोठमोठे दगड पुराच्या प्रवाहात वाहून गेले. मात्र श्री बहीरमदेव महाराजांची मूर्ती मात्र जशीच्या तशी त्याच जागी स्थिर राहिली. या घटनेने गावकऱ्यांच्या मनात बहीरमदेव महाराजांप्रती श्रद्धा अधिकच बळावली. आजही आसपासच्या गावांमधून हजारो लोक बहीरमदेवांना नवस फेडण्यासाठी येतात.

**✻ परंपरेवर श्रद्धेचा विजय**

आजच्या नव्या पिढीचा दृष्टिकोन वैज्ञानिक असला तरी बहीरमदेवाच्या यात्रेतील गूढ परंपरा व श्रद्धेने भारलेली लोकांची गर्दी आजही दाखवते की श्रद्धेचा विजय अद्यापही लोकांच्या हृदयात जिवंत आहे. विज्ञानाला मानणारेही या यात्रेला उपेक्षित करत नाहीत; उलट ही एक परंपरा म्हणून ती सन्मानाने स्वीकारतात.

**कुस्तींच्या दिवशी दुसरा रंग**

यात्रेच्या दुसऱ्या दिवशी घोडदे ग्रामपंचायतीकडून कुस्त्यांचे आयोजन केले जाते. या कुस्ती फडात महाराष्ट्रातील आणि देशपातळीवरील नामवंत पैलवान भाग घेतात. रिंगणात उत्साह, हुशारी व ताकदीची जणू चढाओढच सुरू होते. त्यामुळे यात्रेच्या दुसऱ्या दिवशीही घोडदे गावात उत्सवाचा उत्साह ओसंडून वाहतो.

असा हा घोडदे गावाचा पारंपरिक गळगोंधळ सण आणि यात्रा यंदा चैत्र पोर्णिमेच्या ११ एप्रिल २०२५ रोजी साजरी होणार आहे. आपली श्रद्धा व्यक्त करण्यासाठी, परंपरेचा अनुभव घेण्यासाठी आणि सांस्कृतिक समृद्धीचा भाग बनण्यासाठी आपणही या यात्रेत अवश्य सहभागी व्हा!

## गुढीपाडव्या निमित्त किराणा वाटप





गणेश हिरवे मुंबई प्रतिनिधी

सेंट टेरेसा बॉईज हायस्कूल वांद्रे मुंबई येथील ज्येष्ठ शिक्षिका सीमा जोसेफ यांच्या पुढाकाराने त्यांनी स्वतः पदरमोड करीत जोगेश्वरी येथील सामाजिक कार्यकर्ते गणेश हिरवे यांना सांगून जोगेश्वरी विभागातील गोर गरीब वंचित कुटुंबियांना गुढी पाडव्याच्या मुहुर्त साधत किराणा सामान वितरीत करण्याची विनंती केली. सीमा या सामाजिक जाणीव ठेवून कार्य करणाऱ्या आणि उपक्रमशील शिक्षिका आहेत. मागील अनेक वर्षापासून हिरवे समाजातील उपेक्षित परिवारांना जॉय संस्थेच्या माध्यमातून किराणा सामान, शैक्षणिक वस्तू, आरोग्य किट उपलब्ध करून देत आहेत.त्यांचा या सकारात्मक कृतीचे समर्थन करीत शिक्षिका सीमा यांनी आपल्याला देखील वंचित लोकांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवायचे आहे असे हिरवे यांना सांगून किराणा वितरित करण्याची तयारी दर्शविली आणि हिरवे यांनी दहा कुटुंबांना पाडव्याच्या दिवशी सामान दिले.


## गांधी संस्कार परीक्षेत पारंबी विद्यालयाच्या दोन विद्यार्थिनीची जिल्हास्तरावर निवड

नवीन माध्यमिक विद्यालय, पारंबी तालुका मुक्ताईनगर जिल्हा जळगाव येथे गांधी तीर्थ जैन हिल्स जळगाव तर्फे ही परीक्षा दरवर्षी घेण्यात येते नवीन माध्यमिक विद्यालय पारंबी येथे सुद्धा गेल्या १४ वर्षापासून गांधी संस्कार परीक्षेचे आयोजन सांस्कृतिक कार्यक्रम प्रमुख डॉ. शिवचरण उज्जैनकर हे अखंडपणे राबवित आहेत सन २०२३. २४ या शैक्षणिक वर्षांमध्ये इयत्ता नववीची विद्यार्थ्यांनी कु. पायल पाखरे ही विद्यार्थिनी जिल्हास्तरावर द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेली होती तिचा जैन हिल्स जळगाव येथे मान्यवरांच्या शुभ हस्ते प्रमाणपत्र व मेडल देऊन गौरव करण्यात आला होता सन २०२४. २५ या शैक्षणिक वर्षात सुद्धा इयत्ता आठवी इयत्ता नववी व इयत्ता दहावीचे एकूण ६० विद्यार्थी या परीक्षेला बसलेली होती त्यापैकी इयत्ता नववीतील कु. तनुजा नितीन अंदुरकर व कु. जयश्री धम्मपाल धुंदले या दोन विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरावर द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झालेल्या आहेत तर इयत्ता आठवीतील कु. साक्षी श्रीकृष्ण चिम कु. आचल ईश्वर कोळी कु. विद्या विनोद तायडे विद्यालयातून अनुक्रमे प्रथम द्वितीय आणि तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेले आहेत तसेच इयत्ता नववीतील कु.तनुजा नितीन अंदुरकर कु. भावना सुरेश जाधव कु. जयश्री धम्मपाल धुंदले अनुक्रमे प्रथम द्वितीय आणि तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेले आहेत त्याचप्रमाणे इयत्ता दहावीतील कु.स्वाती विजय आंदूरकर कु. रुचिका पद्माकर घाइट आणि कु. प्रीती रामेश्वर गवई अनुक्रमे प्रथम द्वितीय आणि तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेले आहेत या विद्यार्थिनींना व जे या परीक्षेला सहभागी झालेले होते या सर्वांनाच विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा या परीक्षेचे आयोजक सांस्कृतिक कार्यक्रम प्रमुख डॉ. शिवचरण उज्जैनकर यांच्या शुभहस्ते विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन नुकतेच गौरविण्यात आले याप्रसंगी मुख्याध्यापक श्री एस.डी. ठाकूर सर यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केलेले आहे. याप्रसंगी विद्यालयाचे शिक्षक श्री एस. एस. नागे श्री रोहन आठवले श्री अजय इंगळे शिक्षकेतर श्री रघुनाथ इंगळे श्री विनायक इंगळे व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बी.एल.ओ. डयुटीवर नियुक्त आणि निवडणूक कार्यालयात कार्यरत अतिरिक्त शिक्षकांना उन्हाळयाची सुट्टी जाहीर करावी.

**श्री तानाजी कांबळे, अध्यक्ष - महाराष्ट्र पुरोगामी शिक्षक संघटना यांची मा जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी.**

राज्यातील सर्व शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांना दिनांक ०२ मे २०२५ पासून १५ जून २०२५ पर्यंत उन्हाळयाची सुट्टी शासनाने जाहीर केली आहे. विद्यार्थी आणि शिक्षकांना सदरहू उन्हाळ्याची सुट्टी असणार आहे. शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयातील अनेक अतिरिक्त शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी निवडणूक कार्यालयात बी एल ओ पदावर कार्यरत आहेत. विदयार्थीसंख्येअभावी अतिरिक्त



महाराष्ट्र पुरोगामी शिक्षक संघटना

जावक क्रमांक - MPSSM- 014/2025 दिनांक - 03/04/2025

प्रति
मा. मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
मा. जिल्हाधिकारी मुंबई शहर जिल्हा
मा. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा
मा. उपजिल्हा निवडणूक अधिकारी मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्हा
मा. मतदान नोंदणी अधिकारी १५२ ते १८७ विधानसभा मतदारसंघ

विषय: बी.एल.ओ. डयुटीवर नियुक्त आणि निवडणूक कार्यालयात कार्यरत अतिरिक्त शिक्षकांना उन्हाळ्याची सुट्टी जाहीर करणे बाबत.

महोदय,

संदर्भित विषयान्वये आपणांस विनंतीपूर्वक कळवू इच्छितो की, राज्यातील सर्व शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांना दिनांक ०२ मे २०२५ पासून १५ जून २०२५ पर्यंत उन्हाळ्याची सुट्टी शासनाने जाहीर केली आहे. विद्यार्थी आणि शिक्षकांना सदरहू उन्हाळ्याची सुट्टी असणार आहे.

शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयातील अनेक अतिरिक्त शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी निवडणूक कार्यालयात बी एल ओ पदावर कार्यरत आहेत. विद्यार्थीसंख्येअभावी अतिरिक्त झाल्याने अनेक शिक्षक आपल्या - निवडणूक कार्यालयात बी. एल. ओ. तसेच इतर कार्यालयीन पदावर कामकाज करीत आहेत. आपण वेळोवेळी दिलेली जबाबदारी अत्यंत प्रामाणिकपणे आमचे अतिरिक्त शिक्षक बांधव पार पाडीत आहेत.

मे महिन्याच्या काळात शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना सुट्ट्या असल्याने अनेक शिक्षक आपल्या कुटुंबियांसोबत मूळगावी जात असतात. काही कौटुंबिक कार्यक्रमांचे नियोजन ही याच सुट्टीच्या कालावधीत केले जाते. शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांतील शिक्षकांना उन्हाळ्याची सुट्टी - जाहीर करण्यात आली आहे. मात्र निवडणूक कार्यालयात बी एल ओ आणि इतर पदांवर कार्यरत अतिरिक्त शिक्षकांना निवडणूक कार्यालयाने उन्हाळ्याची सुट्टी जाहीर केलेली नाही.

तरी आपल्या निवडणूक कार्यालयात कार्यरत अतिरिक्त शिक्षकांना /बी एल ओ डयुटीवर नियुक्त शिक्षकांना उन्हाळ्याची सुट्टी देण्यात यावी आणि मा. मतदान नोंदणी अधिकारी १५२ ते १८७ विधानसभा मतदारसं यांना कार्यवाही करणेबाबत सूचित करण्यात यावे, ही विनंती.

आपले विश्वासू

श्री तानाजी कांबळे, राज्याध्यक्ष
श्री संजय केवटे, सचिव

Email id :- purogamimumbaishikshak@gmail.com

झाल्याने अनेक शिक्षक निवडणूक कार्यालयात बी. एल. ओ. तसेच इतर कार्यालयीन पदावर कामकाज करीत आहेत. आपण वेळोवेळी दिलेली जबाबदारी अत्यंत प्रामाणिकपणे अतिरिक्त शिक्षक बांधव पार पाडीत असल्याची माहिती संघटनेचे प्रसिद्धी प्रमुख श्री युवराज कलशेट्टी यांनी दिली.मे महिन्याच्या काळात शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना सुट्ट्या असल्याने अनेक शिक्षक आपल्या कुटुंबियांसोबत मूळगावी जात असतात. काही कौटुंबिक कार्यक्रमांचे नियोजन ही याच सुट्टीच्या कालावधीत केले जाते. शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयांतील शिक्षकांना उन्हाळ्याची सुट्टी - जाहीर करण्यात आली आहे. मात्र निवडणूक कार्यालयात बी एल ओ आणि इतर पदांवर कार्यरत अतिरिक्त शिक्षकांना निवडणूक कार्यालयाने उन्हाळ्याची सुट्टी जाहीर केलेली नाही. निवडणूक कार्यालयात कार्यरत अतिरिक्त शिक्षकांना /बी एल ओ डयुटीवर नियुक्त शिक्षकांना उन्हाळ्याची सुट्टी देण्यात यावी आणि मा. मतदान नोंदणी अधिकारी १५२ ते १८७ विधानसभा मतदारसं यांना कार्यवाही करणेबाबत सूचित करण्यात यावे अशी मागणी संघटनेचे अध्यक्ष श्री तानाजी कांबळे यांनी केली आहे. याबाबत मागणी निवेदन मा. मुख्य निवडणूक अधिकारी, मा. जिल्हाधिकारी मुंबई शहर जिल्हा मा. जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा, मा. उपजिल्हा निवडणूक अधिकारी मुंबई शहर आणि मुंबई उपनगर जिल्हा यांना पाठविण्यात आले.

# बीड जिल्हा डिजिटल मीडिया परिषदेचे तालुकाध्यक्ष व कार्याध्यक्ष निवड जाहीर

गेवराई : मराठी पत्रकार परिषदेशी सलग्न असलेल्या डिजिटल मीडिया परिषदेच्या बीड जिल्ह्यातील ७ तालुकाध्यक्ष आणि कार्याध्यक्षांसह त्या तालुक्यातील कार्यकारणीची निवड डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी जाहीर केली असून, जिल्ह्यातील सर्व डिजिटल मीडिया परिषदेच्या सक्रिय सदस्यांची नोंदणी करणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांच्या नेतृत्वाखाली आणि डिजिटल मीडिया परिषदेचे राज्याध्यक्ष अनिल वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यात डिजिटल मीडिया परिषद काम करत आहे. प्रिंट मीडिया सोबतच डिजिटल मीडियाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाल्याने, या क्षेत्रातील युट्युब चॅनेल, इंस्टाग्राम, फेसबुक, ब्लॉग, व्हाट्सअप, ऑनलाइन दैनिक यासह वेगवेगळ्या डिजिटल मीडियाच्या माध्यमातून हजारो पत्रकार कार्यरत आहेत. डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी बीड जिल्ह्यातील ७ तालुक्यांच्या तालुकाध्यक्ष आणि कार्याध्यक्षांसह त्या तालुक्यातील कार्यकारणी जाहीर केली आहे. यात बीड-तालुकाध्यक्ष- अभिजीत पवार, कार्याध्यक्ष - लक्ष्मण गायकवाड, अंबाजोगाई-तालुकाध्यक्ष- अभिजीत लोमटे, कार्याध्यक्ष- सतीश मोरे, केज तालुकाध्यक्ष- रामदास तपासे, कार्याध्यक्ष इकबाल शेख, परळी-तालुकाध्यक्ष- नितीन ढाकणे, कार्याध्यक्ष - सय्यद सहाबत अली, वडवणी-तालुकाध्यक्ष- ओमप्रकाश साबळे, पाटोदा-तालुकाध्यक्ष- गोकुळ इंगोले, कार्याध्यक्ष - हरिदास शेलार, किल्ले धारूर-तालुकाध्यक्ष- मनोज खिंडरे, कार्याध्यक्ष - सतीश पोतदार या सर्व पदाधिकाऱ्यांची निवड पुढील दोन वर्षासाठी करण्यात आली असल्याचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी जाहीर केले आहे. सर्व तालुकाध्यक्ष व पदाधिकारी यांनी डिजिटल मीडिया मध्ये काम करणाऱ्या सर्व पत्रकारांना संघटित करून त्यांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी आणि लोक जागृतीसाठी काम करावे असे आवाहन जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी केले आहे. बीड जिल्ह्यातील डिजिटल मीडिया परिषदेच्या निवड झालेल्या सर्व तालुकाध्यक्ष व नूतन पदाधिकाऱ्यांचे मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख, विश्वस्त किरण नाईक, शरद पाबळे, मराठी पत्रकार परिषदेचे प्रदेशाध्यक्ष मिलिंद आष्टीवकर, डिजिटल मीडिया परिषदेचे प्रदेशाध्यक्ष अनिल वाघमारे, प्रदेश सदस्य जितेंद्र सिरसाट, मराठी पत्रकार परिषदेचे विभागीय सचिव रवी उबाळे, विभागीय समन्वयक सुभाष चौरे, परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके, डिजिटल मीडिया परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे, परिषदेचे कार्याध्यक्ष गजानन मुडेगावकर, सरचिटणीस सुभाष सुतार, परिषद प्रतिनिधी विलास डोळसे यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.



This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com